# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 18/10/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील मौजा परसोडी भुमेश्वर हरीचंद्र अगडे यांचे घरी किरायने येथे दिनांक 14/10/2021 चे 17.00 वा. ते दिनांक 16/10/2021 चे 16.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– देवीदास हरीभाउ कंगाले, वय 42 वर्ष, रा. चारगाव मुगलाई उमरेड ह. मु. परसोडी भुमेश्वर हरीचंद्र अगडे यांचे घरी किरायने हे शेतीच्या कामाकरीता परिवारासह त्यांचे मुळ गावी गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप व कुंडी तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने स्वयंपाक खोलीत ठेवलेली गोदरेज लोखंडी आलमारीचे कपाट व आतील लॉकर खोलुन त्यात ठेवलेले सोने चांदीचे दागिने एकुण कि. 38,000/–रू. व नगदी 14,000/–रू रोक रक्कम असा एकुण कि. 52,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि तारूदत्त बोरसरे 9764118811 हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील मौजा हिवराबाजार येथे दिनांक 16/10/2021 चे 19.00 वा. ते 19.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– ग.भा भाग्यश्री आशिष मसराम, रा. हिवराबाजार यांचे राहाते घराचे अज्ञात आरोपीने समोरील दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लाकडी आलमारीचे लॉकर मधील सोन्या–चांदीचे दागीने कि. 21,950/–रू. व नगदी रोख रक्कम 4,000/–रू. असा एकुण कि. 25,950/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मोरेश्वर नागोसे 8600655085 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर